प्रेस नोट दि. २९/०५/२०२१

## गुन्हे शाखा, युनिट-४, पिंपरी-चिंचवडची कारवाई

## पिंपरी चिंचवड व पुणे शहर परिसरात लेबर कॅम्प मध्ये मोबाईल फोन चोरी करणाऱ्या आरोपी व त्याचे दोन विधिसंघर्षीत साथिदारांना ताब्यात

## एकुण ४,७३,१००/- रु. किं चे ३३ मोबाईल फोन, सोन्याचे दागिने व ऑटो रिक्षा जप्त

दि. २८/०५/२०२१ रोजी गुन्हे शाखा युनिट-४, चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, प्रसाद गोकुळे यांचे मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख व पोलीस पथक वाकड हिंजवडी भागात मोबाईल चोरी व वाढती घरफोडी चोरी गुन्हयाचे अनुषगाने पेट्रोलिंग करीत असताना गुन्हे शाखा युनिट-४ कडील **पोना/मुंढे, पोशि/२१०२ सैद, पोशि/२२९३ शिंदे, पोशि/१८७२ चव्हाण** यांना त्यांचे बातमीदारामार्फत मिळालेल्या माहिती नुसार माय कार, मारुती सुझुकी शोरुम, मुंबई बेंगलोर हायवे, भुमकर येथे सापळा लावुन चोरीचे मोबाईल फोन विक्री करिता आलेले आरोपी नामे **सुरेश ऊर्फ आण्णा बाबुदास वैष्णव, वय-२६ वर्षे, रा-त्रिमुर्ती अपार्टमेंट, २ रा मजला, रुम नंबर-१७, वरवे बु, ता-भोर, जि-पुणे व त्याचे दोन विधिसंघर्षीत साथिदार वय अनुक्रमे १४ व १५ वर्षे दोन्ही रा-तरवडे वस्ती, वानवडी** यांना ताब्यात घेवुन त्यांचे कडुन सॅमसंग कंपनीचे-४, रेडमी कंपनीचे-७, ओपो कंपनीचे-०६, नोकीया कंपनीचा-०१, मोटोरोला कंपनीचा-०१, विवो कंपनीचे-०९, टेक्नो कंपनीचे-०३, आशुष कंपनीचे-०२ असे एकुण ३३ मोबाईल फोन व ११ ग्रॅम सोन्याचे दागिने तसेच चोरी करण्यासाठी वापरत असलेली ऑटो रिक्षा असा एकुण ४,७३,१००/- रु. किं चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला होता.

**त्यांचेकडे सदर मुद्देमाला बाबत कसुन तपास करता नमुद आरोपी व विधिसंघर्षीत बालक हे तिघे मिळुन रात्रीचे वेळी त्यांचे कडील रिक्षाने लेबर कॅम्प असलेल्या परिसरात फिरुन तेथे राहणाऱ्या मजुरांचे पत्र्यांचे घरांमध्ये फटीतुन आत हात घालुन कडी उघडुन प्रवेश करुन मिळेल तो मुद्देमाल चोरी करत असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यांचे कडे मिळुन आलेला मुद्देमाल हा त्यांनी हिंजवडी, भारती विद्यापीठ, हडपसर, वानवडी व राजगड (पुणे ग्रामीण ) या पोलीस ठाणेचे हद्दितुन विविध लेबर कॅम्प मधुन चोरी केले असल्याचे निष्पन्न झाले असुन त्यांचे कडुन खालील गुन्हे उघडकीस आणले आहेत.**

१) हिंजवडी पोलीस ठाणे गु.र.नंबर-३२१/२०२१ भा.दं.वि.कलम- ३८०
२) हिंजवडी पोलीस ठाणे गु.र.नंबर-३६७/२०२१ भा.दं.वि.कलम- ३८०
३) राजगड पोलीस ठाणे (पुणे ग्रामीण) गु.र.नंबर-२३२/२०२१ भा.दं.वि.कलम- ३८०
४) भारती विद्यापीठ पोलीस ठाणे, प्रॉपर्टी मिसिंग नंबर-३७९७२/२१
५) हडपसर पोलीस ठाणे, प्रॉपर्टी मिसिंग नंबर-४२५७३/२१
६) वानवडी पोलीस ठाणे, प्रॉपर्टी मिसिंग नंबर-४३०००/२१

त्यांचे कडे मिळुन आलेल्या ११ मोबाईल फोन व सोन्याचे दागिन्यांचे मालकांचा शोध लागला असुन उर्वरित २२ मालकांचा शोध घेते वेळी सदर मोबाईल फोन लेबर कॅम्प मधुन चोरले असल्याने व लॉक डाऊन मुळे बरेच लेबर हे त्यांचे मुळगावी निघुन गेले असल्याने त्यांचेशी संपर्क होवु शकला नाही. तरी हिंजवडी, भारती विद्यापीठ, हडपसर, वानवडी व राजगड (पुणे ग्रामीण ) या परिसरातील लेबर कॅम्प मधील ज्या नागरीकांचे मोबाईल फोन अशा प्रकारे चोरीस गेले आहेत त्यांनी गुन्हे शाखा,युनिट-४,पिंपरी चिंचवडचे डांगेचौक कार्यालयाशी संपर्क साधण्याचे अवाहन करण्यात येत आहे.

सदर आरोपी विरुद्ध यापुर्वी वाहन चोरीचे ०३ तर दोन्ही वि.सं.बालकां विरुद्ध वाहन चोरीचे प्रत्येक १९ गुन्हे दाखल आहेत

**सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त मा. श्री. कृष्ण प्रकाश सो, अपर पोलीस आयुक्त मा. श्री. रामनाथ पोकळे सो, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे मा. सुधीर हिरेमठ सो, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे मा. श्री. प्रशांत अमृतकर सो यांचे मार्गदर्शनाखालील गुन्हे शाखा, युनिट-४ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रसाद गोकुळे, सहायक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख, सहायक पोलीस निरीक्षक सिद्धेश बाबर, सहा.पो.उप.नि. धर्मराज आवटे, दादाभाऊ पवार, पोहवा/ प्रविण दळे, नारायण जाधव, संजय गवारे, अदिनाथ मिसाळ, राहिदास आडे, पोना/ तुषार शेटे, लक्ष्मण आढारी, मो. गौस नदाफ, वासुदेव मुंडे, संतोष असवले, पोशि/ शावरसिध्द पांढरे, प्रशांत सैद, सुनिल गुट्टे, तुषार काळे, सुरेश जायभाये, धनाजी शिंदे, सुखदेव गावंडे, गोंविद चव्हाण, आणि तांत्रिक विश्लेषन विभाग गुन्हे शाखा चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय तुंगार, सहा.पो.उप.नि राजेंद्र शेटे, पोहवा/ नागेश माळी, पोशि/विकास आवटे, पोशि/पोपट हुलगे यांनी केली आहे.**

**(सुधीर हिरेमठ) भा.पो.से)**
पोलीस उप-आयुक्त, गुन्हे
गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड

